# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. १७/ २०१३** **दिनांक ०४.११.२०१३**
**स्थळ- शिर्डी कार्यालय** **वेळ- दुपारी- १२.०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा सोमवार दि.०४.११.२०१३ रोजी दुपारी १२.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात (साईनिवास अतिथीगृहात) आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं. एसएसएस/ वशी-०४/ ३५२०/ २०१३, दिनांक ०२ नोव्हेंबर, २०१३ रोजीचे पत्राने सर्व सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा सोमवार दि.०४.११.२०१३ रोजी दुपारी १२.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहात मा.अध्यक्ष श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. श्री.अजय मोरे, कार्यकारी अधिकारी, सदस्य

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा.अध्यक्ष मा.श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत मा.डॉ.संजीवकुमार, जिल्हाधिकारी, अहमदनगर, तथा सदस्य यांनी दूरध्वनीवरुन कळविले. त्याची नोंद घेण्यात येऊन, समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

यानंतर विषय पत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरू करणेत आली.

**विषय नं.०१ (अ) नोंद घेण्याचे विषय.**

**०१. श्री साईनाथ रुग्णालयात माहे सप्टेंबर- २०१३ मध्ये गरीब रुग्णांना वैद्यकिय बीलात दिलेल्या सवलतीची नोंद घेणे.**

साईनाथ रुग्णालयात माहे सप्टेंबर- २०१३ मधील अंतररुग्ण व बाह्यरुग्ण तसेच थॅलसेमिया व हिमोफेलिया रुग्णांसाठी रुपये २,१५,९१५/- मात्र रकमेची वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.८७४ (A) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०२. श्री साईनाथ रुग्णालयात माहे सप्टेंबर- २०१३ या महिन्यात आलेल्या वैद्यकीय अनुदान मागणी अर्जाबाबत.**

श्रीसाईनाथ रुग्णालयामध्ये माहे सप्टेंबर- २०१३ मधील रु.५१,०९,८६१/- मात्र देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदान तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.८७४ (B) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.०२ श्री साई प्रसादालयातील आर. ओ. प्लँटचे भोवती ८ फुट उंच चेनलींक जाळीचे कंपाऊंड करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधील तरतूद :-** अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट-कलम (१) च्या खंड (क) अन्वये *मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल व्यवस्थापन व प्रशासन* करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधींचा विनियोग करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावना:-** श्री साई प्रसादालयास ISO २२०००-२००५ (Food Safety Standard) चे मानांकन मिळविणेकरिता संस्थानमार्फत कार्यवाही करणेत येत आहे. प्रसादालयास ISO २२०००-२००५ मानांकन मिळवून देणाऱ्या कंपनीचे ऑडीटर यांनी दि.२०/०९/२०१३ व दि. २१/०९/२०१३ रोजी श्री साईप्रसादालयाचे पर्यवेक्षण केले आहे. व त्यानंतर दि. २१/०९/२०१३ रोजी श्री. बी.डी. साबळे, कार्यकारी अधिकारी यांचे कक्षात मिटींग घेणेत आली. प्रसादालय विभागाने त्यांचे उपरोक्त संदर्भीय टिपणी अन्वये आर. ओ. प्लॉन्टचे भोवती संरक्षण भिंत किंवा चेनलिंक जाळी बसविणेस कळविले आहे.

**प्रस्ताव:-** आर. ओ. प्लॉन्टचे परिसरात कोणीही प्रवेश करु नये तसेच वाऱ्यामुळे धुळ जाऊ नये याकरिता आर. ओ. प्लॉन्टचे शेडच्या भोवती साधारण ८ फुट ऊंचीची चेनलींक जाळी बसवावी व त्यावर ग्रीननेट लावावे. असे मा. कार्यकारी अधिकारी यांचे समवेत झालेल्या बैठकीत सुचना दिलेल्या होत्या. याकामी आवश्यक मटेरीअल करणेसाठी खालील तपशिलानुसार खर्च अपेक्षीत आहे.

| अ.नं. | मटेरीअलचा तपशिल | परिमाण / एकक | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | चेनलिंक जाळी<br>२" x २" साईज, १० गेज ५' उंच | ८० किलो | ६०/- | ४,८००/- |
| २. | चेनलिंक जाळी<br>२" x २" साईज, १० गेज ८' उंच | २१० किलो | ६०/- | १२,६००/- |
| ३. | M.S. Angle. ७५x७५x५ | ३४५ किलो | ४८/- | १६,५६०/- |
| ४. | M.S. Angle. ५०x५०x५ | ७० किलो | ४८/- | ३,३६०/- |
| ५. | M.S. Angle. २५x२५x५ | २३५ किलो | ४८/- | ११,२८०/- |
| | | | **एकूण रक्कम** | **४८,६००/-** |

उपरोक्तप्रमाणे मटेरीअल विहीत पध्दतीने खरेदी करुन मेकॅनिकल विभागामार्फत अँगल बसवून वेल्डींग करुन इकडील विभागामार्फत त्यावर चेनलींक जाळी बसवता येईल. तसेच आवश्यक तेथे कॉंक्रीटमध्ये अँगल रोवण्याचे काम इकडील विभागामार्फत उपलब्ध मटेरीअलमधून करता येईल.

**विभागाचा अभिप्राय/ मत:-**

तरी श्री साई प्रसादालयातील आर. ओ. प्लॅन्ट भोवती ८ फुट ऊंचीची चेनलींक जाळी चे कंपाऊंड करणेस व त्याकामी चेनलिंक जाळी व अँगल खरेदी करणेकरीता येणारे अंदाजे रक्कम रु. ४८,६००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी सदरहु प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८७५ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयातील आर. ओ. प्लँटचे भोवती ८ फुट उंच चेनलींक जाळीचे कंपाऊंड करणेकामी आवश्यक असणारे साहित्य विहीत पध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.४८,६००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०३ साई आश्रम भाग- ०१ व ०२ येथील खोल्या/ हॉलमध्ये कपडे वाळविणेसाठी एस.एस. पाईप बसविणे कामाचे अंतिम बील आदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतूद:-** अधिनियम कलम- २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (त्र) अन्वये " भक्तांच्या निवासासाठी व त्यांच्या उपयोगासाठी विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे अशी तरतूद आहे."

**व्यवस्थापन समिती निर्णय:-**

१) मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २८ एप्रिल २०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३६२ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय संमत करणेत आलेला आहे.

"... यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे साई आश्रम भाग-०१ व भाग-०२ येथील खोल्या/ हॉलमध्ये कपडे वाळविण्यासाठी एस.एस. पाईप बसविणेकरीता रक्कम रु.१०,९६,७६०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. याकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले".

२) मा. व्यवस्थापन समितीचे दि.२६ फेब्रुवारी २०१३ रोजीचे सभेतील नि.क्र.१२५ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय संमत करणेत आलेला आहे.

"... यावर सविस्तर चर्चा होऊन, साई आश्रम प्रकल्पाचे भाग-०१ व ०२ येथील खोल्या/ हॉलमध्ये कपडे वाळविणेसाठी एस.एस. पाईप बसविणेकामी मे. पवार इलेक्ट्रो सिस्टीमस् प्रा.लि., नाशिक यांचे रु.२१,९०,०००/- मात्रचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले. "

३) मा. व्यवस्थापन समितीचे दि.२१/०६/२०१३ रोजी सभेतील नि.क्र.४५५ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय संमत करणेत आलेला आहे.

"...यावर सविस्तर चर्चा होऊन, ठेकेदार मे.पवार इलेक्ट्रो सिस्टिमस् प्रा. लि., नाशिक यांचे मूदतवाढ मागणीचे प्रस्तावाचा विचार करुन त्यांना दि.२५/०६/२०१३ अखेर मूदतवाढ देणेचे प्रस्तावास मान्यता देणेत आली."

**प्रस्तावना :-** ०१. दि.२७/०८/२०१२ रोजी याकामी वर्तमानपत्रातील जाहिरातीव्दारे निविदा मागविणेत आल्या त्यावेळी मा. कार्यकारी अधिकारी यांचेशी झालेल्या समक्ष चर्चेनुसार साई आश्रम भाग-०२ येथील हॉलमध्ये एक ऐवजी दोन ठिकाणी एस. एस. पाईप बसविणेचे ठरले व त्यानुसार निविदा तयार करणेत आल्या त्यामुळे भाग-०२ चे कामाचे परिमाणात व त्याअनुषंगाने खर्चात वाढ झाली आहे.

०२. पहिल्या वेळेस निविदा मागविणेत आल्या त्यावेळी फक्त ०२ सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या होत्या. तद्नंतर याकामी जास्तीत जास्त प्रतिसाद मिळणेकामी Minimum Qualifying Criteria शिथिल करुन दि.०५/११/२०१२ रोजीचे वर्तमानपत्रात दुसऱ्यांदा जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविणेत आल्या. त्यावेळी फक्त ०१ सिलबंद निविदा प्राप्त झाली, अशाप्रकारे एकूण ३ सिलबंद निविदा प्राप्त झाल्या होत्या.

०३. मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोरील PIL No.१८/२०११ मधिल सिव्हिल

ॲप्लिकेशन नं.१२६९५/२०१२ व १४३७२/२०१२ वर दि.२०/०२/२०१३ रोजी झालेल्या आदेशातील कलम -१२ अन्वये मे. कोर्टाने सदरहू कामासाठी येणारे रक्कम रु.१०,९६,७६०/- मात्रचे खर्चास परवानगी दिलेली आहे.

०४. तद्नंतर याकामी प्राप्त झालेल्या एकूण ०३ सिलबंद निविदा मा. व्यवस्थापन समितीचे दि.२६/०२/२०१३ रोजीचे सभेत उघडणेत आल्या सदरहू सभेतील नि.क्र.१२५ अन्वये, मे. पवार इलेक्ट्रो सिस्टीम्स् प्रा.लि., नाशिक यांचे रु.२१,९०,०००/- मात्रचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.

०५. उपरोक्त निर्णयाचे अनुषंगाने ठेकेदार मे. पवार इलेक्ट्रो सिस्टीम्स् प्रा.लि., नाशिक यांना याकामी इकडील जा.क्र.एसएसएसटी/बांध/५८९९/२०१३, दि.२५/०३/२०१३ रोजी सदर कामाचा कार्यादेश देणेत आला व त्यानुसार ठेकेदार यांनी कामास सुरुवात करुन सदरचे काम दि.०९/०८/२०१३ रोजी पूर्ण केले आहे. सदर कामाचे अंतिम बिल ठेकेदार यांनी दि.१४/१०/२०१३ रोजी सादर केलेले असून त्याची तपासणी केली असता झालेल्या कामाची एकूण रक्कम रु.२१,७२,८४८/- मात्र इतकी आहे.

०६. याकामी निविदा अंतिम करतेवेळी मा. कार्यकारी अधिकारी यांचे सूचनेवरुन साई आश्रम भाग-०२ येथील एका हॉलमध्ये एक ऐवजी दोन ठिकाणी (८.४mtr ऐवजी १३.८० mtr.) एस.एस. पाईप लावण्याचे ठरले. असे एकूण १९२ हॉलचे परिमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे सदर कामाचे परिमाणात व पर्यायाने खर्चात वाढ झाली आहे. तसेच या कामाचे ०३ सिलबंद निविदा दि.१८/०९/२०१२, दि.१९/०९/२०१२ व दि.२६/११/२०१२ अशा तारखांना दोन वेळेस जाहिरात देऊन प्राप्त झालेल्या आहेत. सदर कामाचे अंदाजपत्रक एप्रिल-२०१२ मध्ये तयार करणेत आले होते. त्यानंतर निविदा नोव्हेंबर-२०१२ मध्ये प्राप्त झाल्या या सात महिन्यांचे कालावधीत एस.एस.पाईपचे दरात मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली आहे. परिणामी सदर कामासाठी मंजूर रकमेपेक्षा रक्कम रु.१०,७६,०८८/- मात्र इतका जादा खर्च झालेला आहे.

**विभागाचा अभिप्राय/ मत :-** मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोरील PIL No. १८/२०११ मधील सिव्हिल ॲप्लिकेशन नं.१२६९५/२०१२ व १४३७२/२०१२ वर दि.२०/०२/२०१३ रोजी झालेल्या आदेशातील कलम-१२ अन्वये मे. कोर्टाने सदरहू कामासाठी येणारे रक्कम रु.१०,९६,७६०/- मात्रचे खर्चास परवानगी दिलेली आहे. तथापी वर नमूद केलेप्रमाणे कामाचे परिमाण वाढल्याने व मटेरीअलचे दर वाढल्याने याकामाचे खर्चात मंजूर रकमेपेक्षा रक्कम रु.१०,७६,०८८/- मात्र इतका वाढीव खर्च झालेला आहे.

तरी याकामी झालेल्या रक्कम रु.१०,७६,०८८/- मात्रचे वाढीव खर्चास परवानगी घेणेकामी मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर सिव्हिल ॲप्लिकेशन दाखल करणेस मान्यतेस्तव सविनय सादर. तसेच मा. न्यायालयाचे परवानगीनंतर ठेकेदार यांचे वाढीव खर्चासह एकूण रु.२१,७२,८४८/- मात्रचे अंतिम बिल अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८७६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साई आश्रम भाग- ०१ व ०२ येथील खोल्या/ हॉलमध्ये कपडे वाळविणेसाठी एस.एस. पाईप बसविण्याच्या कामाचे परिमाण वाढल्याने मटेरीअलचे दर वाढल्याने याकामाचे खर्चात मंजूर रकमेपेक्षा रु.१०,७६,०८८/- मात्र आलेल्या वाढीव खर्चास मान्यता देण्यात येऊन, सदर रक्कम मे. पवार इलेक्ट्रो सिस्टीम्स् प्रा.लि., नाशिक यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच, सदर वाढीव झालेल्या खर्चाची माहिती संस्थान वकिलामार्फत मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांना कळविणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.०४** **सन २०१२-१३ मधील वार्षीक खरेदीमधील मंजूर दराने औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी साहित्य अतिरिक्त खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:-** मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२५/०८/२०१२ निर्णय क्रमांक ७२० Clause No.६ अन्वये मागणी केलेल्या औषधांच्या साठ्यापैकी काही औषधांची अतिरिक्त मागणी करावयाची असल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने खरेदी करुन रु. २५,०००/- पेक्षा अधिक रक्कमेच्या औषधांची मागणी करावयाची झाल्यास दैनंदिन कामाची गैरसोय होऊ नये, म्हणून ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मंजुरीने खरेदी करुन केवळ नोंद घेण्यासाठी / माहितीस्तव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावे, असे ठरले आहे.

**प्रस्ताविक :-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात दैनंदिन वापरासाठी लागणाऱ्या औषधे, सर्जिकल व कन्झूमेबल साहित्याकरीता सन २०१२-२०१३ या वर्षाकरीता वार्षिक निविदेतील मंजूर दराने एकुण ११७ पुरवठा धारकांना एकुण रक्कम रु. २४,९२,४८,०३०/- चे दि.२६/११/२०१२ रोजी पुरवठा आदेश देण्यात आलेले आहे.

त्यानुसार पुरवठा आदेशाप्रमाणे मालाचा पुरवठा चालू आहे तर त्यातील काही मालाचा पुरवठा पुर्ण झालेला आहे. त्यापैकी सध्या सोबतच्या यादीतील औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्यापैकी काही आयटमचा औषध भांडारात साठा शिल्लक नाही. सदरचे औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्य दैनंदिन वापरासाठी आवश्यक आहे. तसेच दोन्ही रुग्णालयात राजीव गांधी जीवनदायी योजना कार्यान्वित झालेली आहे. सदर योजनेअंतर्गत होणाऱ्या शस्त्रक्रिया व उपचार चालु असताना पुर्ण बरा होऊन डिसचार्ज दिल्यानंतर १० दिवसांची औषधे मोफत दयावी लागतात त्यामुळे औषधांचा खप हा वाढलेला आहे, त्यामुळे जसाजसा खप वाढेल व जशी जशी लागेल तशी तशी औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्य खरेदी करावी लागणार आहेत.

सदर औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी साहित्य वार्षिक मंजुर दरानुसार वेगवेगळ्या मंजूर पुरवठा धारकांकडून सदरचे खरेदीकामी पुर्णांकित रक्कम रु. ६१,५०,३५४.८४इतका खर्च येणार आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच अर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमानः-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२(ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल. त्यासाठी संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालये चालविण्यात येते. सदर रुग्णालयाकरिता औषधे/ सर्जिकल/ लॅबोरॅटरी साहित्य खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मतः-** रुग्णांची वाढती संख्या व राजीव गांधी योजने अंतर्गत उपचार घेणारे रुग्णांकरीता खरेदी करणे आवश्यक आहे.

तरी सदरचे खरेदीकामी येणाऱ्या पुर्णांकित रक्कम रु. ६१,५०,३५५/- चे खर्चाची नोंद घेण्यासाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.८७७ यावर सविस्तर चर्चा होऊन, रुग्णांची वाढती संख्या व दोन्ही रुग्णालयातील राजीव गांधी योजने अंतर्गत उपचार घेणारे रुग्णांमुळे औषधांचा खप वाढता आहे. यामुळे सन २०१२-१३ मधील वार्षीक खरेदीमधील मंजूर दराने औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी साहित्य अतिरिक्त खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रु. ६१,५०,३५५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात येऊन, सदर प्रस्तावाची नोंद घेण्यात आली.**

**तसेच, याकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.०५ डॉ.मनिषा उमेशचंद्र आग्रवाल, Ophthalmologist (नेत्र विकार तज्ञ) श्री साईनाथ रुग्णालय यांची संस्थान सेवा पुढे चालू ठेवणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी अधिनियम २००४ मधील समितीचा कार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी कलम १३ (४) मध्ये प्रामुख्याने खालीलप्रमाणे तरतूद आहे.

समितीस, संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिकाऱ्यांची (कार्यकारी अधिकाऱ्याव्यतिरिक्त) व कर्मचाऱ्यांची नेमणूक करता येईल:

परंतु, ज्या अधिकाऱ्याला किंवा कर्मचाऱ्याला दरमहा दोन हजार रुपयाहून अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिकाऱ्याची किंवा कर्मचाऱ्याची नेमणूक समितीकडून, असे पद शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येईपर्यंत, केली जाणार नाही अशी तरतूद आहे.

शासनाचे मंजूर केलेल्या आकृतीबंधातील अटी-शर्ती क्र. ३- सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नियुक्ती करावी, असे नमूद केले आहे.

त्यानुसार दोन्ही रुग्णालयांकरीता तज्ञ वैद्यकिय अधिकारी, आर एम ओ, सी एम ओ. आदि. आवश्यक पदे भरणेसाठी दि. २१/०६/२०१२ रोजीचे द. इंडियन एक्सप्रेस या वर्तमान पत्रात व संस्थान वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करुन त्यानुसार संबंधीत पदांसाठी प्राप्त झालेल्या अर्जदार उमेदवारांच्या मुलाखती दि. २९/०७/२०१२ रोजी घेण्यात आल्या होत्या.

सदर मुलाखतीचा अहवाल मा. व्यवस्थापन समितीचे दि. २५/०८/२०१२ रोजीचे सभेमध्ये सादर करुन सदर सभेतील निर्णय क्र. ६८३ नुसार डॉ. मनिषा उमेशचंद्र आग्रवाल यांची श्री साईबाबा हॉस्पीटलकडे जा. नं. एसएसएस/ एसएसबीएच/एचआर/२७०९/२०१२ दि. ३०/०८/२०१३अन्वये वेतनबॅन्ड रु. १५६००-३९१०० मध्ये मुळ वेतन रु. १८७५०+ ग्रेड वेतन रु. ६६०० व इतर अनुज्ञेय भत्ते लागू करुन Ophthalmologist (नेत्र विकार तज्ञ) या पदावर एक वर्ष कालावधीसाठी तात्पुरती नेमणूक करण्यात आली आहे. त्यानुसार त्या दि. ०४/१०/२०१२ रोजी कामावर हजर झाल्या आहेत. जा.

नं. एसएसएस/एसएसबीएच/एचआर/१३३९/२०१३ दि. २८/०१/२०१३ अन्वये डॉ. आग्रवाल यांचे नाव श्री साईनाथ रुग्णालयाचे आस्थापनेवर वर्ग करण्यात आले आहे.

डॉ. मनिषा उमेशचंद्र आग्रवाल, Ophthalmologist (नेत्र विकार तज्ञ)- श्री साईनाथ रुग्णालय यांचें एक वर्षाच्या कालावधीमध्ये काम समाधानकारक आहे. ते हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने काम करतात. त्यांचे विषयी काहीही प्रकरणे चालू नाहीत. तरी त्यांची संस्थान नियमाप्रमाणे सेवा पुढे चालू ठेवणे व संस्थान सेवेत कायम करणेस हरकत नाही, असा गोपनीय अहवाल वैद्यकिय अधिक्षक, श्री साईनाथ रुग्णालय यांनी दिलेला आहे.

डॉ. मनिषा उमेशचंद्र आग्रवाल ह्या Ophthalmologist (नेत्र विकार तज्ञ) या पदावर दि. ०४/१०/२०१२ रोजी कामावर हजर झाल्या असून, त्यांनी एक वर्षाचे तात्पुरते नेमणूकीच्या कालावधीमध्ये ६४ रजा घेतलेल्या असल्याने त्यांचा तात्पुत्या नेमणूकीचा कालावधी ६४ दिवसांनी वाढलेला आहे. सदरचा वाढीव कालावधी दि. ०६/१२/२०१३ अखेर संपुष्टात येत असल्याने डॉ. मनिषा आग्रवाल यांना नेमणूकी संदर्भात देण्यात आलेल्या आदेशातील अटी-शर्ती आहे तशाच कायम ठेऊन त्यांची संस्थान सेवा वाढीव कालावधी संपुष्टात आल्याच्या लगतच्या तारखेपासून म्हणजेच दि. ०७/१२/२०१३ रोजीपासून पुढे चालू ठेवता येईल.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे प्र. वैद्यकिय अधिक्षक, श्री साईनाथ रुग्णालय यांचे गोपनीय अहवालानुसार डॉ. मनिषा उमेशचंद्र आग्रवाल, Ophthalmologist (नेत्र विकार तज्ञ)- श्री साईनाथ रुग्णालय यांची संस्थान सेवा दि. ०७/१२/२०१३ रोजीपासून पूर्वीच्याच अटी-शर्तीवर चालू ठेवणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८७८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्र. वैद्यकीय अधिकारी, श्री साईनाथ रुग्णालय यांचे अभिप्राय व गोपनीय अहवालानुसार डॉ.मनिषा उमेशचंद्र आग्रवाल, Ophthalmologist (नेत्र विकार तज्ञ) यांची संस्थान सेवा दि.०७.१२.२०१३ पासून पुर्वीच्या अटी-शर्तीवर चालू ठेवण्यात यावी, असे ठरले.**
(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.०६** **भक्तनिवासस्थान (५०० रुम) इमारतीच्या खोल्यांमध्ये नविन फॅन खरेदी करुन बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** शिर्डी मध्ये येणा-या साईभक्तांची निवासाची व्यवस्था व्हावी म्हणून संस्थानमार्फत २० वर्षापुर्वी साई भक्तनिवासस्थान ही इमारत बांधण्यात आलेली आहे. या इमारतीमधील `ए` विंग मधील १०० खोल्यांचे नुतनीकरणांचे काम करण्यात आलेले असून सदरच्या खोल्या साईभक्तांना वापराकरीता देण्यात येत आहेत.

नुतनीकरणाचे वेळेस खोल्यांमधील काही इलेक्ट्रीकल फिटींग्ज बदलण्यात आल्या. परंतू सिलींग फॅन बदलण्यात आलेले नाहीत. सदरील खोल्यांमधील फॅन जुने झाल्याने वारंवार दुरुस्त व वाईडींग करण्यात आल्याने फॅनचा स्पीड कमी झालेला आहे. तसेच फॅन जुने झाल्याने नविन नुतनीकरण केलेल्या खोल्यांमधील सजावटीस ते सुसंगत दिसत नाहीत. सदरील १०० खोल्यांमधील फॅन बदलून मिळणेबाबत साईभक्तनिवासस्थान विभागाने कळविलेले आहे.

साईभक्तनिवासस्थानच्या `ए` विंग १०० खोल्यांमधील फॅन नविन बसविणेकरीता आपणास पुढीलप्रमाणे फॅन खरेदी करावे लागणार आहे.

| Sr.No. | C.S.R.NO | Description | Qty. | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01) | 2-6-3 | Supplying and erecting Crompton make, High Speed Ceiling fan of 1200 mm. sweep complete erected in position as per specifcation no. FG-FN/CF Color – Brown | 200 Nos. | 1,643.25 | Rs. 3,28,650.00 |
| 02) | 2-8-4 | Dismantling the existing ceiling fan/exhaust fan/cabin fan/ bracket fan complete with accessories, G.I. down rod, frame etc. and making the site clear. | 200 Nos. | 19.25 | Rs. 0,03,850.00 |
| | | | | **Total Rs:-** | **Rs. 3,32,500.00** |

उपरोक्तप्रमाणे भक्तनिवासस्थान (५०० रुम) इमारतीच्या खोल्यांमध्ये नविन सिलींग फॅन कोटेशन मागवून खरेदी करणेकरीता रक्कम रुपये ३,३२,५००/- खर्च येणे अपेक्षित आहे. सदरील खर्चास व सिलींग फॅन खरेदी करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.८७९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, भक्तनिवासस्थान (५०० रुम) इमारतीच्या खोल्यांमध्ये प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे नविन सिलींग फॅन बसवणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन सदर फॅन खरेदी करणेस व याकामी अंदाजे रु.३,३२,५००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**
(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.०७** **माहे नोव्हेंबर- २०१३ अखेर गुंतवणूकीविषयी निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** माहे नोव्हेंबर,२०१३ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणेः -

| अ.नं. | तपशील | मुदतपूर्तीचा दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| ०१ | बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी | ६/११/२०१३ | ३,२८,२४,५८२/- |
| ०२ | विजया बँक, शिर्डी | ६/११/२०१३ | १,०९,४१,५२७/- |
| ०३ | विजया बँक, शिर्डी | ६/११/२०१३ | १,०९,४१,५२७/- |
| ०४ | विजया बँक, शिर्डी | ६/११/२०१३ | १,०९,४१,५२७/- |
| ०५ | बँक ऑफ महाराष्ट्र | ७/११/२०१३ | ३,२८,२४,५८२/- |
| ०६ | बँक ऑफ महाराष्ट्र | ७/११/२०१३ | ४,३७,६६,११०/- |
| ०७ | विजया बँक, शिर्डी | ८/११/२०१३ | ४,३७,६६,११०/- |
| ०८ | विजया बँक, शिर्डी | ८/११/२०१३ | ३,२८,२४,५८२/- |
| ०९ | विजया बँक, शिर्डी | १२/११/२०१३ | ४,३७,६६,११०/- |
| १० | विजया बँक, शिर्डी | १२/११/२०१३ | ४,३७,६६,११०/- |
| ११ | विजया बँक, शिर्डी | १२/११/२०१३ | २,१८,८३,०५५/- |
| १२ | विजया बँक, शिर्डी | १२/११/२०१३ | ४,३७,६६,११०/ |
| १३ | विजया बँक, शिर्डी | १२/११/२०१३ | ४,३७,६६,११०/ |
| १४ | आंध्रा बँक, शिर्डी (NPAY) | १४/११/२०१३ | ३३,६०,११०/- |
| १५ | विजया बँक, शिर्डी | १७/११/२०१३ | ४,३७,६६,११०/- |
| १६ | विजया बँक, शिर्डी | १७/११/२०१३ | २,१८,८३,०५५/- |
| १७ | विजया बँक, शिर्डी | १७/११/२०१३ | ४,३७,६६,११०/- |
| १८ | यूनियन बँक ऑफ इंडिया, शिर्डी | २६/११/२०१३ | ४७,११,७६,०८९/- |
| १९ | आंध्रा बँक, शिर्डी (NPAY) | २६/११/२०१३ | २८,६३,७७०/ |
| २० | दैनंदिन खर्च वजा जाता माहे नोव्हेंबर २०१३ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी अंदाजे रक्कम | | १०,००,००,०००/- |
| | **एकूण रक्कम-** | | **११०,२५,९३,२८६/-** |

वरील तपशीलानुसार साधारणत: रक्कम रु. ११०.२५ कोटी गुंतवणूकीसाठी उपलब्ध आहेत.

उपलब्ध होणारी रक्कम ही नियमित सेवा देणा-या राष्ट्रीयीकृत बँकेकडे उच्चतम व्याजदराने गुंतविल्यास त्यांचेकडून संस्थानला जास्तीत-जास्त सेवाही मिळविता येतील. विश्वस्तव्यवस्थेचे वैधानिक लेखापरिक्षण करतेवेळी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होत असलेली रक्कम ही स्थानिक राष्ट्रीयीकृत/सेवा देणा-या बँकेकडेच जास्तीत-जास्त व्याजदराने गुंतविण्यात यावी असे लेखापरिक्षक यांनी सुचविले असल्याने, संस्थानला प्रामुख्याने सेवा देणा-या खालील बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे सदरची गुंतवणूक करता येईल असे नम्र मत आहे:-

१ ) आंध्र बँक, शिर्डी
२) बँक ऑफ बरोडा, नासिक
३) बँक ऑफ इंडीया, शिर्डी
४) कॅनरा बँक, शिर्डी
५) सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी
६) कॉर्पोरेशन बँक, शिर्डी
७) स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी
८) युको बँक, शिर्डी
९) युनियन बँक ऑफ इंडीया, शिर्डी
१०) बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी
११) विजया बँक, शिर्डी
१२) इंडीयन बँक, शिर्डी
१३) ओरीएंटल बँक ऑफ कॉमर्स, शिर्डी
१४) स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, शिर्डी

तरी अ.नं. १ ते १४ या बँकांकडून जसजशी गुतवणूकीसाठी रक्कम उपलब्ध होईल तसतसे व्याजदर मागवून जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम रु.११०.२५ कोटींची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यासाठी सदरचा विषय मा व्यवस्थापन समितीच्या मान्यतेसाठी सादर.

निर्णय क्र.८८० **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे अ.नं. १ ते १४ व देना बँक, शाखा- शिर्डी या सर्व स्थानिक राष्ट्रीयीकृत सेवा देणाऱ्या बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणाऱ्या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम रु. ११०.२५ कोटी मात्रची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.०८ संस्थान निर्मित शिरडी श्री साईबाबा की व्हीसीडी व श्री साईचरित्र तामिळ ऑडीओ MP३ (एमपीथ्री) निर्मिती कामाचे खर्चास मंजुरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे १०.०१.२००८ चे सभेतील विषय नं.७१ निर्णय क्र.७१ नुसार मे.सोनी डीएडीसी मॅन्युपॅक्चरींग इंडिया प्रा.लि., मुंबई यांचेकडील सी.डी./ व्हीसीडी निर्मितींसाठी असलेल्या शर्ती /अटी मान्य करण्यात येऊन त्यांचेकडून कायमस्वरुपी संस्थान निर्मित सी.डी., व्हीसीडी चे काम करुन घेण्यास मान्यता मिळालेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८.१०.२००८ चे सभेतील निर्णय क्र.८१२ नुसार संस्थान प्रकाशित पुस्तके/ फोटो/छपाई करणे, संस्थान प्रकाशित सी.डी. निर्मिती करणे व विक्री किंमती ठरविणे वगैरे कामाची कार्यालयीन पद्धती निश्चित करण्यात आली आहे. त्यात सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम १४ चा नं. १७ ठ मध्ये समितीची कर्तव्ये व अधिकार यातील तरतुदीनुसार भक्तांची गैरसोय होऊ नये, वेळोवेळी साठा उपलब्ध व्हावा याकरीता खालील सुधारित पद्धत अवलंबणे बाबत विचार करण्यात आलेला आहे .

सोनी कंपनीची सी.डी. निर्मितीची गुणवत्ता चांगली असल्याने त्यांचेकडून मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार दरपत्रक मागविण्यात यावे व त्यानुसार मा. कार्यकारी अधिकारी यांनी कार्यादेश द्यावेत. असे ठरले आहे.संस्थान निर्मित खालील ऑडीओ सीडीचा साठा अल्प प्रमाणात शिल्लक असल्याने त्यांची पुनर्निर्मिती करुन घेणे आवश्यक आहे. त्यानुसार मे. सोनी डीएडीसी मॅन्युपॅक्चरींग इंडिया प्रा.लि., मुंबई यांचेकडून खालील प्रमाणे दरपत्रक मागविण्यात आले असून, त्यांचे दि.०५.१०.२०१३ चे पत्रातील दराने प्रस्तावित परिमाणाचे पुनरनिर्मिती खर्चाचा तपशिल पुढीलप्रमाणे.

| अ.नं. | तपशिल | शिल्लक संख्या | शिल्लक किती महिने पुरेल | निर्मिती संख्या | एक्साइज, व्हॅटसह दर | एकूण रक्कम रुपये | संस्थान विक्री किंमत रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई सतचरित्र - तामिळ (डीव्हीडी एमपी ३) | ८८ | ०१ | ११,००० नग | ३८.०५ | ४१८५५०/- | ५०.०० |
| ०२ | गुरुपाठाचे अभंग- (दोन सी.डी.चा संच) | ५० | ०१ | ५,००० संच | ३८.०५ | १९०२५०/- | ५०.०० |
| ०३ | शिर्डी श्री साईबाबा की व्हीसीडी (एका नगाची सी.डी.) | ९८ | ०१ | १५००० नग | २५.३८ | ३८०७००/- | ५०.०० |
| | | | | | **एकूण रु.** | **९,८९,५००/-** | |

वरील तक्त्यात दर्शविलेप्रमाणे ऑडीओ/व्हीडीओ/डीव्हीडी यांची पुनर्निर्मिती मे सोनी डीएडीसी मॅन्युफॅक्चरींग इंडिया प्रा.लि.,मुंबई यांचेकडून करुन घेणेस रु.९,८९,५००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. कंपनीचे शर्ती अटीनुसार कंपनीस अग्रीम रक्कम द्यावी लागते.

सबब M/s.Sony DADC Manufacturing India Pvt. ltd. Mumbai यांचेकडून प्रस्तावित काम करुन घेणेस त्याकामी येणारे ९,८९,५००/- मात्रचे खर्चास तसेच M/s.Sony DADC Manufacturing India Pvt. ltd. Mumbai नावाने रुपये ९,८९,५००/- चा डी.डी. काढण्यास मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.८८१ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावीत ऑडीओ/ व्हीडीओ/ डीव्हीडी यांची पुनर्निर्मिती मे सोनी डीएडीसी मॅन्युफॅक्चरींग इंडिया प्रा.लि.,मुंबई यांचेकडून करुन घेणेस व याकामी येणाऱ्या अपेक्षित रु.९,८९,५००/- मात्र खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच कंपनीचे अटी-शर्तीनुसार सदरहू रक्कम मे सोनी डीएडीसी मॅन्युफॅक्चरींग इंडिया प्रा.लि.,मुंबई यांना आगाऊ देण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.०९ व्दारकामाई सेवा ट्रस्ट, कनकुरी रोड, शिरडी येथील वृध्दाश्रमातील वृध्दांना वाढीव प्रसादभोजन मोफत देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद:-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.२१ (भाग-१) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापीत केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील २१ (घ) नूसार भक्तांना जेवण पुरविणे व अन्नछत्र चालविणे.

**मा.व्यवस्थापन समिती:-** दिनांक-०६.०३.२०१० चे सभेतील निर्णय क्रं.३०६ व दि.०८.१०.२०१२ चे सभेतील निर्णय क्रं. ८५७

**प्रस्तावना:-** व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार शिर्डी परिसरातील अंध,अपंग,मुकबधीर,अनाथ व धार्मिक (वारकरी) शिक्षण संस्था,शाळा व वृध्दाश्रमातील वृध्दा व्यक्तीना मोफत व सवलीचे दरात प्रसादभोजन खालीलप्रमाणे पुरविणे येत आहे.

| अ. नं. | संस्थेचे/शाळेचे नाव | मंजूर संख्या | भोजन सुविधेचा प्रकार | वाढीव मागणी |
|---|---|---|---|---|
| ०१ | ह.भ.प.काशिनाथ महाराज सेवाभावी टस्ट निमगांव संचलित श्री साईबाबा वारकरी शिक्षण संस्था, निमगाव-शिर्डी, नगर-मनमाड रोड | ४२ | मोफत | --- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०२ | श्री साई ग्रामीण बहुउददेशीय समासेवी संस्था संचलित साईबाबा बालसदन (अनाथश्रम) नगर मनमाड रोड जनेश्वर मंदीराचे समोर,शिरडी | ३० | मोफत | बंद |
| ०३ | आधार शिक्षण व ग्रामीण विकास मंडळ नांदूर दुमाला ता.संगमनेर संचलित श्री साई सेवा मतीमंद मुला-मुलीची शाळा,शिडी साकुरी शिव शिर्डी | ६० | मोफत | --- |
| ०४ | द्वारकामाई सेवा ट्रस्ट, वृध्दाश्रम,कनकुरी रोड,शिडी | २५ | मोफत | ४५ |
| ०५ | श्री साईश्रध्दा ग्रामीण मुक बधीर, विघालय, पिंपळवाडी रोड | १०८ | रु.२२५/- या सवलतीचे दरात | --- |
| ०६ | पद्मश्री डॉ.वि.ए.विखे पाटील विद्यालय, बाभळेश्वर | १०० सकाळी ५० रात्री | मोफत | --- |
| ०७ | संत विचारधारा वारकरी शिक्षण संस्था, भोजडे ता.कोपरगाव | ५० | मोफत | -- |
| ०८ | माऊली मेडीकल रिसर्च फंाउडेशन ,गणेशनगर (वाकडी) माऊली मतिमंद मुलांची निवासी कार्यशाळा | २० | मोफत | -- |

उपरोक्त प्रमाणे अ.नं.४ संदर्भिय अन्वये द्वारकामाई सेवा ट्रस्ट, कनकुरी रोड, शिरडी येथील वृध्दाश्रमातील २५ वृध्दाना सायंकाळचे एक वेळचे जेवण श्री साई प्रसादालयातील स्वखर्चाने घेऊन जाणेस व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार कळविणेत आलेले होते.श्री साई प्रसादालयामधून सध्या ते २५ व्यक्तीचे भोजन मोफत घेऊन जात आहेत.

**मागणी:-** द्वारकामाई सेवा ट्रस्ट, कनकुरी रोड, शिरडी यांनी संदर्भिय अ.नं.३ पत्रामध्ये एका दानशुर भक्तांने इमारत बांधून दिलेली असल्यामुळे या इमारतीत १०८ वृध्दांची (स्त्री-पुरुष) व्यवस्था होऊ शकते तथापी वृध्दाश्रमात ७० वृध्द (स्त्री-पुरुष) आहे. वृध्दाश्रमातील वृध्दांची संख्या २५ हून ७० पर्यंत वाढलेल्या वृध्दानांही दररोज एक वेळेस मोफत प्रसादभोजन मिळावे अशी मागणी केलेली असल्यामुळे मोफत प्रसादभोजन ही बाब महत्वाची असल्याने सदरचा विषय मा.व्यवस्थापन त्रिसदस्य समितीचे सभेत निर्णयार्थ सादर करता येईल.

**संस्थान अधिनियम /ठराव यानूसार अनुमान:- आर्थिक**

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-** ०१. संदर्भिय अ.नं.१ व २ नुसार आपण द्वारकामाई सेवा ट्रस्ट, कनकुरी रोड, शिरडी येथील वृध्दाश्रमातील २५ वृध्दांना सायंकाळचे एक वेळचे मोफत प्रसादभोजन घेऊन जाणेस मान्यता देण्यात आलेली आहे.

०२. संदर्भिय अ.नं.३ चे पत्रानुसार त्यांनी वाढीव भोजन घेऊन जाणेबाबतची मागणी व्यवस्थापन समितीने मान्य केल्यानंतर त्यांना वाढीव भोजन घेऊन जाणेबाबत कळविणेत येईल.

तरी द्वारकामाई सेवा ट्रस्ट, कनकुरी रोड,शिरडी येथील वृध्दांना वाढीव मोफत भोजन देणेबाबतची बाब ही आर्थिक असल्याने सदरचे प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८८२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, व्दारकामाई सेवा ट्रस्ट, कनकुरी रोड, शिरडी येथील वृध्दाश्रमातील वृध्दांना प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे वाढीव प्रसादभोजन मोफत देणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, श्री साईप्रसादालय विभाग)

---

**विषय नं.१०** **शिर्डी मंदिर सुरक्षा करीता २० नग वॉकीटॉकी सर्व साहित्यासह मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.पोलिस अधिक्षक सो, अहमदनगर यांनी दि.०१.१०.२०१३ रोजीच्या पत्रा नुसार श्री साई मंदिर सुरक्षाकामी कायमस्वरुपी कार्यरत असलेले पोलिस अधिकारी व कर्मचारी यांना सुरक्षा कर्तव्या दरम्यान संपर्काकरीता वॉकी टॉकीची अत्यंत आवश्यकता आहे. संस्थानचे संरक्षण विभागकडे उपलब्ध जुन्या वॉकीटॉकीची तपासणी केली असता त्या UHF बॅन्डमधील (क्षिप्रता -३५० MHZ) असून त्या वापरुन कालबाह्य झाल्या आहेत. कर्तव्याकामी कार्यरत असलेले पोलिस अधिकारी/कर्मचारी यांना मंदिर सुरक्षा येथे सध्या आपण वापरत असलेले चॅनेल व अहमदनगर पोलिस दलाकरीता मंजुर असलेले चॅनेल या दोन्हीवरील संपर्क होणेकरिता मोटोरोला VHF वॉकीटॉकी वॉकीटॉकी (१४६ ते १७४ MHZ ) XIR P ८२६८ With linked Capacity Plus Mode सुविधा असलेल्या वॉकीटॉकी नग २० सर्व साहित्यासह पुरविणेस विनंती केलेली आहे.

त्यानुषंगाने श्री साई मंदिर सुरक्षा विभाग यांना संरक्षण विभागाकडे उपलब्ध असलेले मे.व्हेन्टेज कंपनीकडून खरेदी केलेले व्हरटेल कंपनीच्या ०२ नग वॉकी टॉकी पोलिस विभागास देण्यात आलेल्या होत्या.परंतु संस्थानचे वॉकी टॉकी VERTAL कंपनीचे व पोलिस विभागाकडे असलेले मोटोरोला

कंपनीच्या वॉकीटॉकी यांची एकमेकांशी फ्रिक्वेन्सी मॅच होत नसल्याने एकमेकांशी संदेश वहन होत नाही. त्यामुळे सदर वॉकी टॉकी पोलिस विभागाने पुन्हा संरक्षण विभागाकडे जमा करण्यात आलेल्या आहे.

तरी मोटोरोला VHF वॉकीटॉकी (१४६ ते १७४ MHZ) XIR P 8268 With linked Capacity Plus Mode चे एकुण २० नग वॉकीटॉकी खरेदी करण्यासाठी अंदाजे रक्कम रुपये ७,००,०००/- मात्र (अ.रु.सात लाख) खर्च अपेक्षित आहे.

करीता उपरोक्त प्रमाणे २० नग वॉकीटॉकी खरेदी कामी वृत्तपत्रात जाहिरात देऊन खरेदी करणेस व येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.७,००,०००/- (अ.रु.सात लाख) मात्रच्या खर्चास मान्यता असावी हि विनंती.

**निर्णय क्र.८८३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई समाधी मंदिर सुरक्षाकामी आवश्यक असलेले २० नग वॉकीटॉकी साहित्य वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन विहित पध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अपेक्षित रु.७,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**विषय नं.११** **स्टेट बँक ऑफ इंडिया यांना संस्थानचे साईनाथ छाया इमारतीतील ए.टी.एम. चे जागेस मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. त्रिसदस्य समितीचे दि.२५/०८/२०१२ रोजीचे सभेतील विषय नं. ६० निर्णय क्रं.७१५ अन्वये स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा-शिर्डी यांना साईनाथ छाया इमारतीमधील तळमजल्यावरील एक गाळा नऊ स्क्वेअर मीटर जागा ए.टी.एम.चे वापरासाठी दि.२८/०८/२०१२ ते दि.२७/०७/२०१३ अखेर ११ महिने कालावधीसाठी मासिक परवाना फीमध्ये १० % वाढ करुन म्हणजे रु.३,९६०/- व मिटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन पुर्वीचेच अटी/ शर्तीनुसार लिव्ह अँड लायसन्स तत्वावर मुदतवाढ देणेत यावी, असा निर्णय झालेला आहे.

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.१६/१०/२०१२ रोजी दिलेल्या आदेशात पॅरा नं. ६ (अ) मध्ये- shall not take any steps in creating third party interest in the movable or immovable properties of the Respondent No.2-trust; असा असून त्यात संस्थानचे चल वा अचल मालमत्तेसंदर्भात कोणत्याही प्रकारे तिऱ्हाईत व्यक्तीचा हक्क निर्माण होईल असे पाऊल उचलू नये.

व (ब) मध्ये- shall not enter into an agreement, contract for purchase of any immovable property on behalf of the Respondent No.2 - Trust; असा असून त्यात संस्थान मार्फत कोणत्याही प्रकारचे अचल मालमत्तेच्या खरेदीचे कॉन्ट्रक्ट किंवा करारनामे करु नये. असा आदेश झालेला आहे.

उपरोक्त ठरावास अनुसरुन व मा.उच्च न्यायालयाचे दि.१६/१०/२०१२ रोजीचे आदेशास अनुसरुन सदरचा विषय पुन्हा दि.२६/०२/२०१३ रोजीचे मा.त्रिसदस्य समितीचे सभेत विषय नं.५५ निर्णय क्र. १७५ अन्वये मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे दि.१३/०८/२०१३ रोजीचे आदेशास अनुसरुन स्टेट बँक ऑफ इंडिया यांना ए.टी.एम. साठी संस्थाचे सिटी सर्व्हे नं.३२ मधील साईनाथ छाया इमारतीतील तळमजल्यावरील ९ स्क्वे.मी. जागेस ११ महिने कालावधीसाठी (दि.२८/०८/२०१२ ते दि.२७/०७/२०१३ अखेर) लिव्ह अँड लायसस तत्वावर मासिक परवाना फी रुपये- ३,९६०/- व मिटर रिडींग प्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन पुर्वीच्याच अटी शर्तीवर जागा वापरांस जा.क्र. एसएसएस वशी- विधी/२४२८/२०१३ दि. २८/०८/२०१३ ने परवानगी देण्यात आली आहे. सदरची मुदत दि. २७/०७/२०१३ रोजी संपुष्टात आल्याने स्टेट बँक आफ इंडिया यांनी दि. १०/१०/२०१३ रोजीचे पत्राने पुढील दि. २८/०७/२०१३ ते दि. २७/०७/२०१४ अखेर मुदतवाढ मिळणेस विनंती केली आहे.

स्टेट बँक ऑफ इंडियाचे ए.टी.एम. चा शिर्डी येथे येणा-या देश, विदेशातील साईभक्तांच्या व जनतेच्या सोईसाठी तसेच संस्थानचे व संस्थान नोकरांचे बँकींग कामासाठी बँकेच्या सेवेचा उपयोग होतो. याबाबतचा विचार करता, संस्थानचे सिटी सर्व्हे नं.३२ नगरपंचायत घर नं.८०२ मधील साईनाथ छाया इमारतीतील तळमजल्यावरील ९ स्क्वे.मी. जागा लिव्ह अँड लायसस तत्वावर मासिक परवाना फी रु. ३,९६०/- व मिटर रिडींग प्रमाणे विद्युत बिल वेगळे आकारुन पुर्वीचे अटी-शर्तीस अधीन राहून एक वर्षासाठी दि.२८/०७/२०१३ ते दि.२७/०७/२०१४ मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेवून वापरांस देणेचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८८४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी येथे येणाऱ्या देशी, विदेशी साईभक्तांच्या व जनतेच्या सोईसाठी तसेच, संस्थानचे व संस्थान नोकरांचे बँकीग कामासाठी स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेचे ए.टी.एम. सेवेचा उपयोग होतो. या सुविधेचा विचार करता मुदतवाढ देणेबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांची पुर्व मान्यता घेण्यात येऊन, मान्यतेनंतर सदर बँकेच्या ए.टी.एम.चे जागेस लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर मासिक परवाना फी व विद्युत बील वेगळे आकारुन पुर्वीच्याच अटी/ शर्तीवर दि.२८.०७.२०१३ ते दि.२७.०७.२०१४ पर्यंत मुदतवाढ देण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**विषय नं.१२** **श्री. एस.कृष्णमूर्ती, कंत्राटी पध्दतीने ऑफिस इनचार्ज, माहिती केंद्र, बेंगलोर यांचा मुदतवाढ व मानधनात वाढ मिळणेबाबतच्या अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री एस.कृष्णमूर्ती, ऑफिस इनचार्ज, माहिती केंद्र, बेंगलोर यांनी दि.१५/०९/२०१३ रोजीच्या अर्जाने मुदतवाढ व मानधनात वाढ मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

सदर अर्जावर अधीक्षक, प्रकाशने विभाग यांनी " श्री एस.कृष्णमूर्ती, कार्यालय प्रमुख, माहिती केंद्र, बेंगलोर यांनी संदर्भीय अर्जान्वये नोकरीत मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केली आहे. त्यांचे काम समाधानकारक असून ते प्रामाणिक आहेत. त्यांना दि.०३/११/२०१३ ते ०२/११/२०१४ या कालावधीसाठी जा.नं.एसएसएस वशी ०१/३९७७/२०११ दि.०३/११/२०११ अन्वये दिलेल्या कार्यादेशातील अटी-शर्तीस अधिन राहून मुदतवाढ देणेस हरकत नाही. तसेच त्यांना त्यांचे विनंतीप्रमाणे वाढत्या महागाईचा विचार करुन योग्य ती पगारवाढ देणेस विनंती. " असे अभिप्राय दिलेले आहेत.

श्री एस.कृष्णमूर्ती यांच्या नेमणूकीचा कालावधी दि.०२/११/२०१३ अखेर संपूष्ठात येत असून त्यांनी दि.१५/०९/२०१३ च्या अर्जाने मुदतवाढ व मानधनात वाढ मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९/११/२०११ रोजीच्या सभेतील निर्णयानुसार श्री एस.कृष्णमूर्ती यांची **"ऑफिस इनचार्ज"** म्हणून जा.नं.एसएसएस वशी ०१/३९७७/२०११ दि.०३/११/२०११ अन्वये बेंगलोर येथील संस्थानचे माहिती केंद्रासाठी प्रतिमहा रु.८०००/- एकत्रित वेतनावर एक वर्ष कालावधीसाठी नेमणूक करण्यात आलेली असून ते दि.०३/११/२०११ रोजी कामावर हजर झालेले आहेत.

श्री एस.कृष्णमूर्ती यांच्या अर्जातील विनंती व अधीक्षक, प्रकाशने विभाग यांचे अभिप्राय विचारात घेता श्री एस.कृष्णमूर्ती यांना दि.०३/११/२०१३ पासून पूढे एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ व मानधनात वाढ देणेबाबतच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८८५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहिती केंद्र, बेंगलोर येथून चालत असलेल्या मागील एक वर्षाच्या कामाचा आढावा घेतला असता, हा उपक्रम भक्तोपयोगी असून, ऑनलाईन आरक्षणाचा अनेक भक्तांना लाभ होत आहे व प्रकाशनांचे बाबतीत मागील एक वर्षाची आकडेवारी पहाता प्रकाशनांचे विक्रीत वाढ झालेली आहे. त्यामुळे श्री. एस.कृष्णमूर्ती, कंत्राटी ऑफिस इनचार्ज, माहिती केंद्र, बेंगलोर यांना वाढत्या महागाईचा विचार करता रु.१०,०००/- मात्र मानधनावर पुर्वीचेच अटी/ शर्तीप्रमाणे दि.०३.११.२०१३ पासून पुढे एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, सामान्य प्रशासन/ अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.१३** **श्री.व्ही.कन्नन, कंत्राटी पध्दतीने ऑफिस इनचार्ज, माहिती केंद्र, चेन्नई यांचा मुदतवाढ व मानधनात वाढ मिळणेबाबतच्या अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री व्ही.कन्नन, ऑफिस इनचार्ज, माहिती केंद्र, चेन्नई यांनी दि.१८/०९/२०१३ रोजीच्या अर्जाने मुदतवाढ व मानधनात वाढ मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

सदर अर्जावर अधीक्षक, प्रकाशने विभाग यांनी "व्ही.कन्नन, कार्यालय प्रमुख, माहिती केंद्र, चेन्नई यांनी संदर्भीय अर्जान्वये नोकरीत मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केली आहे. त्यांचे काम समाधानकारक असून ते प्रामाणिक आहेत. त्यांना दि.०३/११/२०१३ ते ०२/११/२०१४ या कालावधीसाठी जा.नं.एसएसएस वशी ०१/३९७६/२०११ दि.०३/११/२०११ अन्वये दिलेल्या कार्यादेशातील अटी-शर्तीस अधिन राहून मुदतवाढ देणेस हरकत नाही. तसेच त्यांना त्यांचे विनंतीप्रमाणे वाढत्या महागाईचा विचार करुन योग्य ती पगारवाढ देणेस विनंती." असे अभिप्राय दिलेले आहेत.

श्री व्ही.कन्नन यांच्या नेमणूकीचा कालावधी दि.०२/११/२०१३ अखेर संपूष्ठात येत असून त्यांनी दि.१८/०९/२०१३ च्या अर्जाने मुदतवाढ व मानधनात वाढ मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९/११/२०११ रोजीच्या सभेतील निर्णयानुसार श्री व्ही. कन्नन यांची "ऑफिस इनचार्ज" म्हणून जा.नं.एसएसएस वशी ०१/३९७६/२०११ दि.०३/११/२०११ अन्वये शिर्डी साई ट्रस्ट चेन्नई (तामिळनाडू) येथील संस्थानचे माहिती केंद्रासाठी प्रतिमहा रु.८०००/- एकत्रित वेतनावर एक वर्ष कालावधीसाठी नेमणूक करण्यात आलेली असून ते दि.०३/११/२०११ रोजी कामावर हजर झालेले आहेत.

श्री व्ही.कन्नन यांच्या अर्जातील विनंती व अधीक्षक, प्रकाशने विभाग यांचे अभिप्राय विचारात घेता श्री व्ही.कन्नन यांना दि.०३/११/२०१३ पासून पूढे एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ व मानधनात वाढ देणेबाबतच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८८६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहिती केंद्र, चेन्नई येथून चालत असलेल्या मागील एक वर्षाच्या कामाचा आढावा घेतला असता, हा उपक्रम भक्तोपयोगी असून, ऑनलाईन आरक्षणाचा अनेक भक्तांना लाभ होत आहे व प्रकाशनांचे बाबतीत मागील एक वर्षाची आकडेवारी पहाता प्रकाशनांचे विक्रीत वाढ झालेली आहे. त्यामुळे श्री.व्ही.कन्नन, कंत्राटी ऑफिस इनचार्ज, माहिती केंद्र, चेन्नई यांना वाढत्या महागाईचा विचार करता रु.१०,०००/- मात्र मानधनावर पुर्वीचेच अटी/ शर्तीप्रमाणे दि.०३.११.२०१३ पासून पुढे एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, सामान्य प्रशासन/ अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** **समाधी मंदिरातील लाईटींग लोड करीता सोलर पी.व्ही. सिस्टीमची उभारणी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** देशभरातून तसेच जगभरातून साईंच्या दर्शनाकरीता साईभक्त शिर्डी येथे येऊन श्रीं ना श्रद्धा सुमन अर्पण करतात. साईभक्तांना अधिक सोयी सुविधा उपलब्ध व्हाव्यात व श्रीं चे दर्शन सुखकर व्हावे म्हणून समाधी मंदिरामध्ये प्रकाश योजनेकरीता टयुब लाईट फिटींग, लावण्यात आलेल्या आहेत. वातावरण थंड राहावे म्हणून सिलींग फॅन, स्टँड फॅन व एअर कुलर बसविण्यात आलेले आहेत. तसेच समाधी जवळ ए.सी.सिस्टिम बसविण्यात आलेली आहे. या सर्व इलेक्ट्रीकल उपकरणांना जुने प्रसादालय येथील सबस्टेशनमधून वीजपुरवठा करण्यात येतो. जुने प्रसादालय येथील सबस्टेशनमध्ये महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून उच्चदाब वीजपुरवठा जोडून घेण्यात आलेला आहे. या वीजपुरवठयाचे पर्यायी वीजपुरवठयासाठी दोन ५०० केव्हीए क्षमतेचे जनरेटरसेट बसविण्यात आलेले आहेत. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा वीजपुरवठा खंडीत झाल्यानंतर जनरेटरसेटचा वीजपुरवठा चालू होणेस साधारणतः एक मिनिट एवढा कालावधी लागतो.

रात्रीचे वेळेस महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा वीजपुरवठा बंद झाल्यानंतर जनरेटरचा वीजपुरवठा चालू होण्यास एक मिनिट एवढा उशिर लागतो. त्यावेळेस मंदिरामध्ये अंधार राहू नये व साईभक्तांची गैरसोय होऊ नये याकरीता आपणास सोलर पी.व्ही. सिस्टिमवर मिळणारी ऊर्जा बॅटरीव्दारे उपकरणांना (दिव्यांना) देऊन उपकरणे चालविता येतील व भक्तांची गैरसोय दूर करता येईल. तसेच वीज बीलामध्येही काही अंशी बचत होण्यास मदत होईल.

मुंबई येथील साईभक्त श्री.पराग शुक्ला व श्रीमती मधू कपूर यांची उर्जा फाऊंडेशन ही सोलर सिस्टिमची उत्पादक कंपनी असून त्यांनी यापूर्वी श्री सिद्धीविनायक मंदिर मुबई येथे अशा प्रकारची सिस्टिम देणगी स्वरुपात दिलेली आहे. त्यांनी मा.कार्यकारी अधिकारी श्री.किशारे मोरे साहेब यांचेशी चर्चा करुन त्यांचे समवेत समाधी मंदिर व मंदिरावरील गच्चीवरील भाग येथील पाहणी केलेली आहे. सोबत तत्संबंधी झालेल्या पत्रव्यवहाराचे ई-मेल जोडलेले आहे. ते समाधी मंदिरातील लाईटींग लोडकरीता साधारणतः १० लाख इतक्या किंमतीची, ५ केडब्ल्यु क्षमतेची सोलर पी.व्ही. सिस्टिम देणगी म्हणून बसवून देण्यास तयार आहेत. सदरील सोलर पी.व्ही.सिस्टिमचे आऊटडोअर युनिट हे समाधी मंदिराचे सभामंडपाचे (नविन इमारतीचे) गच्चीवर बसवावे लागतील व तेथून सप्लाय केबल्स मंदिरामध्ये न्यावा लागतील.

श्री.पराग शुक्ला, ऊर्जा फाऊंडेशन, मुंबई यांना समाधी मंदिराचे लाईटींग लोडकरीता सोलर पी.व्ही. सिस्टिम उभारणी करणेस संमती पत्र दयावे लागणार आहे.

श्री.पराग शुक्ला, ऊर्जा फाऊंडेशन, मुंबई यांना समाधी मंदिरामधील लाईटींग लोड करीता सोलर पी.व्ही.सिस्टिमची देणगी स्वरुपात उभारणी करुन देणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.८८७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२** **स्टेट बँक ऑफ इंडिया यांना संस्थानचे साईनाथ छाया इमारती मधील जागेस पुढील एक वर्षाचे कालावधीसाठी मुदतवाढ मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** भारतीय स्टेट बँकेस शिर्डी येथे येणा-या देश विदेशातील साईभक्तांच्या व जनतेच्या सोईसाठी संस्थानचे सिटी सर्व्हे नं. ३२ नगरपंचायत घर नं.८०२ मधील साईनाथ छाया इमारतीतील पहिल्या मजल्यावरील १६२.८८ स्क्वे.मी. जागा लिव्ह अँड लायसन्स तत्वावर यापुर्वी खालीलप्रमाणे वापरांस देणेत आलेली आहे.

| अ.क्र. | मा.व्यवस्थापन समितीची दिनांक | कालावधी | मासिक परवाना फी |
|---|---|---|---|
| ०१. | दि.२५/११/२००६ चे सभेतील विषय नं.६४ व निर्णय क्र. ९३७ | दि.११/११/२००६ ते दि.१०/११/२००७ | रु.२५,०००/- |
| ०२. | दि.०८/१२/२००७ चे सभेतील आयत्या वेळचा विषय नं.३७ व निर्णय क्र.८२१ | दि.११/११/२००७ ते दि.१०/११/२००८ | रु.२५,०००/- |
| ०३. | दि.१७/०५/२००९ चे सभेतील विषय नं.६२ व निर्णय क्र.४४० | दि.११/११/२००८ ते दि.१०/११/२००९ | दि.१७/०५/२००९ चे सभेत रु.५५,०००/- ठरले होते. त्यानंतर बँकेच्या दि. ६/११/०९ चे पत्रातील विनंतीस अनुसरुन दि. १०/१/१० रोजीचे सभेतील विषय नं.९० निर्णय क्र.९० चे मासिक परवाना फी रु.३०,०००/- आकारणेबाबत निर्णय घेणेत आलेला आहे. |
| ०४. | दि.१०/१/२०१० चे सभेतील विषय नं. ९० व निर्णय क्र.९० | दि.११/११/२००९ ते दि.१०/११/२०१० | रु.३०,०००/- |
| ०५. | दि.१२/०६/२०११ चे सभेतील विषय नं ११८ व निर्णय क्र.४५५ | दि.११/११/२०१० ते दि.१०/११/२०११ | रु.३०,०००/- |
| ०६. | दि.१४/०७/२०१२ चे सभेतील विषय क्र.१०२ व निर्णय क्र. ५४८ | दि.११/११/२०११ ते दि. १०/११/२०१२ | रु.६४,८५०/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ०७ | दि.२६/०२/२०१३ चे सभेतील विषय क्र. ५४ व निर्णय क्र. १७४ | दि.११/११/२०१२ ते दि. १०/११/२०१३ | रु.६४,८५०/- |

मा.त्रिसदस्य समितीचे सभेतील विषय नं. ५४ निर्णय क्र. १७४ व मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगबाद यांचे दि.१३/०८/२०१३ रोजीचे आदेशास अनुसरुन जा.क्र. एसएसएस वशी- विधी/२४२०/२०१३ दि.२३/०८/२०१३ ने स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा-शिर्डी यांना दि.११/११/२०१२ ते दि.१०/११/२०१३ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदरची मुदत दि.१०/११/२०१३ रोजी संपुष्टात येत असलेने स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा-शिर्डी यांनी दि. १०/१०/२०१३ रोजीचे पत्राने पुढील दि. ११/११/२०१३ ते दि. १०/११/२०१४ या एक वर्षाचे कालावधीसाठी मुदतवाढ देणेबाबत विनंती केली आहे.

स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा-शिर्डी यांचा शिर्डी येथे येणा-या देश, विदेशातील साईभक्तांच्या व जातेच्या सोईसाठी तसेच संस्थानचे व संस्थान नोकरांचे बँकींग कामासाठी बँकेच्या सेवेचा उपयोग होतो. याबाबतचा विचार करता, संस्थानचे सिटी सर्व्हे नं.३२ नगरपंचायत घर नं.८०२ मधील साईनाथ छाया इमारतीतील पहिल्या मजल्यावरील १६२.८८ स्क्वे.मी. जागा लिव्ह अँड लायसस तत्वावर मासिक परवाना फी रु. ६४,८५०/- व मिटर रिडींग प्रमाणे विद्युत बिल वेगळे आकारुन पुर्वीचे अटी-शर्तीस अधीन राहून स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा शिर्डीस एक वर्षासाठी (दि.११/११/२०१३ ते दि.१०/११/२०१४) वापरांस देता येईल.

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे दि.१६/१०/२०१२ रोजी दिलेल्या आदेशातील पॅरा नं. ६ (अ) मध्ये- Without prior permission of this Court the Committee shall not take any steps in creating third party interest in the movable or immovable properties of the Respondent No.2-trust; असा असून त्यात मा.कोर्टाचे पुर्व परवानगीशिवाय संस्थानचे चल वा अचल मालमत्तेसंदर्भात कोणत्याही प्रकारे तिऱ्हाईत व्यक्तीचा हक्क निर्माण होईल असे पाऊल उचलू नये. असा आदेश झालेला आहे.

स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा शिर्डी यांना साईनाथ छाया इमारतीतील पहिल्या मजल्यावरील १६२.८८ स्क्वे.मी. जागा लिव्ह अँड लायसन्स तत्वावर दि.११/११/२०१३ ते दि.१०/११/२०१४ पावेतो वापरांस देणेबाबत मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेवून जागा वापरांस देणेबाबतचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८८८ यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी येथे येणाऱ्या देशी, विदेशी साईभक्तांच्या व जनतेच्या सोईसाठी तसेच, संस्थानचे व संस्थान नोकरांचे बँकीग कामासाठी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या सेवेचा उपयोग होतो. या सर्व सुविधांचा विचार करता स्टेट बँक ऑफ इंडिया यांना संस्थानचे साईनाथ छाया इमारती मधील जागेस मुदतवाढ देणेबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांची पुर्व मान्यता घेण्यात येऊन, मान्यतेनंतर सदर बँकेला लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर मासिक परवाना फी व विद्युत बील वेगळे आकारुन पुर्वीच्याच अटी/ शर्तीवर दि.११.११.२०१३ ते दि.१०.११.२०१४ पर्यंत मुदतवाढ देण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३ विश्वस्तांच्या सुचनांबाबत.**

**निर्णय क्र.८८९ मा.विश्वस्तानी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-**

**(१)** समाधी मंदिराचे गाभाऱ्यात आरतीकरीता भक्त उभे राहण्याची क्षमता जवळपास ३०० साईभक्तांची आहे. त्यासाठी सध्या ऑनलाईन व जनसंपर्क कार्यालयाकडून आरती पास दिले जातात. त्यात येथून पुढे प्रत्येक आरतीसाठी ऑनलाईन आरतीकरीताची संख्या १०० व जनसंपर्क कार्यालयाकडून पासेस देण्याची संख्या १०० आणि दर्शन रांगेमधील प्रथम भक्त संख्या १०० असे ३०० साईभक्त गाभाऱ्यात सोडण्यात यावे. जनसंपर्क कार्यालयामार्फत साईभक्तांना आरती पास देताना दिवसातील एकाच आरतीसाठीचा पास देण्यात यावा. त्यामुळे इतर साईभक्तांना देखील आरती पास मिळू शकेल असे दिवसभरातील सर्व आरत्यांसाठी पास मागणाऱ्या साईभक्तांना सांगण्यात यावे.

तसेच ऑनलाईन सुविधेद्वारे एका भक्तासाठी फक्त दिवसभरातील एकाच आरतीसाठीची सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी.

(कार्यवाही- जनसंपर्क कार्यालय/ माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख/ संरक्षण अधिकारी/ अधिक्षक, मंदिर विभाग)

**(२)** श्री.चंद्रकांत माणकचंद सुराणा, कंत्राटी ऑफिस असिस्टंट, माहिती केंद्र, सिकंदराबाद यांनी मानधनात वाढ होणेबाबत अर्ज सादर केलेला आहे.

माहिती केंद्र, सिकंदराबाद येथून चालत असलेल्या मागील एक वर्षाच्या कामाचा आढावा घेतला असता, हा उपक्रम भक्तोपयोगी असून, ऑनलाईन आरक्षणाचा अनेक भक्तांना लाभ होत आहे व प्रकाशनांचे बाबतीत मागील एक वर्षाची आकडेवारी पहाता प्रकाशनांचे विक्रीत वाढ झालेली आहे. त्यामुळे श्री.चंद्रकांत माणकचंद सुराणा, कंत्राटी ऑफिस असिस्टंट, माहिती केंद्र, सिकंदराबाद यांना वाढत्या महागाईचा विचार करता दि.०१.११.२०१३ पासून रु.१०,०००/- मात्र मानधन देणेत यावे.

(कार्यवाही- अधिक्षक, सामान्य प्रशासन/ अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

वरील निर्णय क्र. ८७४ ते ८८९ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर दुपारी ०२.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| (अजय मोरे) | (जयंत कुलकर्णी) |
| कार्यकारी अधिकारी | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | अध्यक्ष |

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी**